# प्रस्तावना

भगवान शंकराचार्यांच्या सर्व रचनांचे सूत्र एकच असले व त्यांत तेच तत्त्वज्ञान पुन्हां पुन्हां मांडलेले असले तरी प्रत्येक रचनेत काही वेगळेपणा असतो. त्यामुळे त्या रचनांचा अभ्यास करतांना नवे बारकावे, वेगळी दृष्टी (Approach), वेगळ्या प्रकारे दिलेला विषयांवरील भर (stress) इत्यादींचा सुखद अनुभव येतो. एकशे चव्वेचाळीस श्लोकांची ही रचना फार लहान किंवा फार मोठीही नाही. पुरेशी (adequate) मात्र आहे. अर्थात साधकाला अपरोक्ष अनुभूती येण्यासाठी असलेल्या अडचणी व त्यासाठी साह्य करणाऱ्या बाबींचा विचार करून ज्या तत्त्वाची प्रत्यक्ष अनुभूती घ्यावयाची त्या आत्मा वा ब्रह्माचाही पुरेसा विचार केला आहे. केवळ सैद्धान्तिक विचार करून आचार्य थांबलेले नाहीत.

सिद्धान्ताभिमुख, साधनाभिमुख व जीवनाभिमुख असे साधनेचे तीन प्रकार मानले तर ह्या ग्रंथात पहिल्या दोनवर भर दिला आहे हे स्पष्टच दिसते. उदा. ग्रंथाचे मंगलाचरण करतांना तटस्थलक्षण ब्रह्म – ईश्वराचे स्मरण करतांना तो सात स्वर्ग व सात पाताळांचा निर्माता आहे असे आवर्जून सांगितले आहे. वस्तुतः अजातवादानुसार किंवा मायेच्या तत्त्वज्ञानानुसार सर्वच ब्रह्मरूप वा मायिक असतांना ह्या चौदांचा उल्लेख का करावा? परंतु अब्जावधी लोकांना दृश्य जग सत्य वाटत असल्याने त्यांच्या समजुतीपुरती अध्यारोपाची भाषा वापरून सामान्य साधकाची ईश्वरावरील श्रद्धा सांभाळली आहे. 'मानत मानत शिकवावे हळूहळू' हे समर्थवचन असेच सांगते. आचार्यांच्या ग्रंथातून त्यांची ही भूमिका स्पष्टपणे सांगितली आहे – **'अध्यारोप अपवादाभ्यां निष्प्रपञ्चं प्रपञ्च्यते। शिष्याणां बोधसिद्ध्यर्थं तत्त्वज्ञैः कल्पितः क्रमः।'**. मांडुक्य कारिकेतील अस्पर्शयोगानुसार दृश्याचा ब्रह्मवस्तूला जराही स्पर्श नसला तरी (ते दृश्य नाहीच म्हणून स्पर्श नाही – अजातवाद) तो आहे असे गृहीत धरून म्हणजे

अध्यारोप करून त्या ब्रह्माचे स्वरूप सांगण्याचा खटाटोप करावा लागतो. ब्रह्माचे स्पष्ट स्वरूप सांगणे व शक्य तर अनुभवून – त्याचा 'अनुभव' येत नाही असा अनुभव सांगून – ते सांगणे ह्याला 'अपवाद' असा व्यवहार्य शास्त्रीय शब्द आहे. '**रज्जुविवर्तस्य सर्पस्य रज्जुमात्रत्ववत् वस्तुभूत ब्रह्मणो विवर्तस्य प्रपञ्चादिः वस्तुभूतरूपतोपदेश अपवादः।**' असे त्याचे लक्षण केले आहे. म्हणजे प्रपंच हा विवर्तरूप असतांना तो सत्य आहे असे सांगणे हा अध्यारोप असून तो तसा नाही ह्या सांगण्याला अपवाद म्हणतात.

ग्रंथाभ्यासाच्या सुरुवातीला वेदान्तशास्त्राच्या काही सरणी समजावून घेतल्या तर तो अभ्यास अधिक उपयुक्त होईल. अपरोक्ष ह्या शब्दाचा 'प्रत्यक्ष' असा अर्थ असून 'प्रत्यक्षप्रमाणाने कळणारे' असा अर्थ नाही. लोकव्यवहारात परोक्ष व अपरोक्ष ह्यांचे नेमके उलटे अर्थ वापरले जातात. 'तू माझ्या अपरोक्ष हे काम का केलेस?' ह्या प्रश्नाचा 'तू माझ्या अनुपस्थितीत, मला न सांगता, परस्पर, मी समोर नसतांना कर्म का केलेस' असा अर्थ होतो. परमार्थात परोक्ष म्हणजे ऐकीव ज्ञान, वाचून झालेले ज्ञान असे अर्थ होतात. '**नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन।**' हे कठश्रुतीतील (१.१.२३) वाक्य असे सांगते की आत्मा ऐकून, बोलून वा केवळ बुद्धीच्या साह्याने कळत नाही. ज्ञानेंद्रियांनी (प्रमाण) कळून किंवा प्रत्यक्ष, अनुमान, उपमानादि प्रमाणांनी अपरोक्ष अनुभूती येत नाही. '**यत् साक्षात् आपरोक्षात् ब्रह्म।**' (बृह. ३.४.१) ही श्रुती ब्रह्म प्रत्यक्षच आहे म्हणजे अनुभवरूप आहे असे सांगते. हे सांगणे लवकर लक्षात येत नाही. 'साक्षात्कार' ह्या शब्दाची साक्षात् व आकार अशी फोड नाही. नकार, होकार इत्यादि लोकव्यवहारात वापरल्या जाणाऱ्या शब्दांप्रमाणे तो एकच शब्द आहे. तेच होणे, तेच होऊन राहणे असे त्या शब्दाचे अर्थ आहेत. '**प्रत्यक्षावगमम्**' (गीता ९.२) ही शब्दयोजना हेच सांगते. 'प्रत्यक्ष अवगमः यस्य' असा त्या शब्दाचा अर्थ आहे.

आत्म्याचा अपरोक्ष अनुभवच खरा अनुभव म्हणजे 'जीव आत्म्याचे ऐक्य अनुभवणे' हा आहे, ह्याची जराही कल्पना नसणारे साधक त्यांच्या

कल्पनेप्रमाणे अनेक साधने करतात. तीर्थयात्रा, व्रते, पूजा, देवदर्शन, पारायणे, स्नाने, कीर्तनादी ऐकणे, नित्यकर्म इत्यादि सर्वांना निश्चितपणे त्यांचे त्यांचे मूल्य आहेच. गीतेला 'कर्मयोगशास्त्र' म्हणून त्यांतील ज्ञानयोगाला कर्माचे उपांग मानण्यापर्यंत कर्म व उपासनांचा पगडा जनमानसावर आहे. परंतु वेदान्तशास्त्राच्या '**नहि अध्रुवैः प्राप्यते हि ध्रुवं तत्**' (कठ २,१०) ह्या वचनानुसार अनित्याने नित्याची प्राप्ती होत नाही. वरील सर्व बाबींमध्ये काहीतरी कृती असून प्रत्येक कृती ही आरंभ व शेवटाने युक्त असते. विभु म्हणजे निरपेक्ष व्यापक ब्रह्माला आरंभ व शेवट नसून ते कोणीही, कशानेही केलेले नाही. ते अकृत आहे म्हणून कोणत्याही कृतीने ब्रह्माचे ज्ञान होत नाही. जे केलेले असते ते यथाकाल नष्ट होते. ब्रह्म अमर, नित्य, सत्य असल्याने व ते 'अज'ही असल्याने मानवी बुद्धीला असलेल्या सवयीचे विचार तेथे कामाला येत नाहीत.

कोणतेही साधन अचेतन असून ते चेतन जीवाने केलेले असल्याने तेही चेतन असल्याचा भ्रम होतो. नामसाधना, ध्यानसाधना, योगसाधना इत्यादि सर्व साधनाप्रकार जीव करीत असल्याने व त्यांना आरंभ व शेवट असल्याने अचेतनच आहेत. नामसाधनेच्या बाबतीत संत श्रीतुकाराम महाराज म्हणतात - '**पहावा विठ्ठल बोलावा विठ्ठल करावा विठ्ठल जीवभाव।**'. ह्या अत्यंत मार्मिक अभंगात चेतन जीवाने बोलण्याची व पाहण्याची क्रिया करीत स्वतःला (जीव) विठ्ठलामध्ये म्हणजेच आत्मस्वरूपात एकरूप करावे. येथे 'करावे' हा शब्द औपचारिक असून 'व्हावे' हे वास्तव आहे. जीव-आत्मैक्य हे सहजच असते. ते नाही असे जे अज्ञानामुळे वाटते, ते अज्ञान बोलण्याच्या व पाहण्याच्या क्रियेमुळे नष्ट होऊन ज्ञानरूप आत्मा असावयाचा तसा असतो. त्याचे ज्ञान 'होत' नाही. जीवभावच नष्ट झाल्यावर ज्ञान होण्यासाठी उरलेच कोण? ह्यातील बारकावा फारच मार्मिक असून 'अकर्ता' आत्मा साधनकर्त्या जीवाला जीवभाव असेपर्यंत अनुभवाला येणे केवळ अशक्य आहे.

हा विषय स्पष्ट सांगणाऱ्या श्रुती बृहदारण्यक उपनिषदात सांगितल्या असून त्यांच्या यथार्थ विचारापासून होणारा निर्णय साधकासाठी अत्यंत उपयुक्त आहे. '**यः पृथिव्यां तिष्ठन् पृथिव्या अन्तरो यं पृथिवी न वेद यस्य पृथिवी शरीरं यः पृथिवीमन्तरो यमयत्येष त आत्मान्तर्याम्यमृतः।**' (३.७.३) – 'जो पृथ्वीत राहणारा पृथ्वीत व्यापून राहतो पण पृथ्वी ज्याला जाणीत नाही. पृथ्वी ज्याचे शरीर असून जो पृथ्वीचे आतून नियमन करतो तो अमृत आत्मा तुझा आहे.' ह्याच प्रकारे पाणी, अग्नी, वायू, आकाश, सूर्य, दिशा, चन्द्र, तारका, प्राण, वाणी, डोळे इत्यादि मोठी यादी दिली आहे. दुसरा मन्त्र पुढील प्रमाणे– '**यद् वै तन्न जिघ्रति जिघ्रन् वै तन्न जिघ्रति न हि घ्रातुर्घ्रातेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वान्न तु तद्द्वितीयमस्ति ततोऽन्यद् विभक्तं यज्जिघ्रेत्।**' (बृह.४.३.२४) – 'जो वास घेत नाही तो वास घेऊनही वास घेत नाही. वास घेणाऱ्याच्या वास घेण्याच्या शक्तीचा कधीच लोप होत नाही कारण तो अविनाशी आहे. ह्या स्थितीत त्याहून वेगळी अशी वस्तूच अस्तित्वात नाही की जिचा तो वास घेईल.' ह्या ब्राह्मणातही (उपनिषदातील अध्यायाचे एक प्रकरण) पुढे चव घेणे, बोलणे, ऐकणे, जाणणे इत्यादि यादी देऊन असेच सांगितले आहे. ह्या मन्त्रसमुदायाचा थोडक्यात असा अर्थ होतो की पंचमहाभूते व ज्ञानेंद्रिये ह्यात आत्मा व्यापून राहून त्यांचे नियमन करीत असला तरी त्यांना आत्म्याचे ज्ञान होत नाही. शिवाय एकमेव, अद्वितीय व भेदशून्य आत्म्याहून वेगळे असे काहीच नसतांना आत्म्याला त्यांचे ज्ञान होईलच कसे?

येथे आणखी एक विचार पंचीकरणाच्या दृष्टीने करता येतो. बुद्धी अग्नितत्त्वाची झाली आहे असे हे शास्त्र सांगते. अग्नीला जर आत्मा जाणता येत नाही तर त्यापासून झालेल्या बुद्धीला तो कसा जाणता येईल? वायूला जर त्यांत व्यापून राहणारा आत्मा जाणता येत नसेल तर त्यापासून झालेल्या मनाला तो कसा जाणता येईल? ह्या रीतीने '**यो बुद्धेः परतस्तु सः।**' (गीता ३.४२) आणि '**यन्मनसा न मनुते**' (केन १.५) ह्या स्मृती व श्रुतिवचनांची संगती उत्तम प्रकारे लागते. ह्या प्रमाणेच केन श्रुतीतील श्रीगुरूंचे सांगणे

चांगले लक्षात येते – **'न विद्मो न विजानीमो यथैतदनुशिष्यादन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि'** (१.१.३) – 'शिष्याला आत्म्याचा उपदेश कसा करावा हे मला कळत नाही. तो आत्मा जे जाणले जाते ते व जे जाणले जात नाही ते, ह्या दोन्हीहून वेगळा आहे'. 'मला आत्मा कळत नाही व सांगता येत नाही' असे शिष्याला स्पष्ट सांगणारे श्रीगुरू व हे ऐकूनही त्यांच्यावर अतूट श्रद्धा ठेवणारे शिष्य ह्यांचा तो काळ होता!

अपरोक्षानुभूती विषयी सांगणारी काही वचने पाहिली तर त्या अनुभूतीचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

१) **यत् साक्षात् अपरोक्षात् ब्रह्म** (बृह. ३.४.१) – ब्रह्म प्रत्यक्ष म्हणजे अपरोक्ष आहे. तेच स्वरूप आहे.

२) **ओम् नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।** (ज्ञाने. १.१) – आत्मरूप आद्य आहे, ते वेदांनी सांगितले आहे व स्वसंवेद्य आहे. ही ओवी ज्ञानेश्वरीचे सूत्र आहे. 'आद्य' ह्या शब्दाने अनादि, नित्य, सत्य, अज, अमर ह्या सर्वांचा उल्लेख आहे असे मानावे.

३) **जडाजडीं अंशीं। राहाटे जे सरिसी। ते चेतना गे तुजसी। लटिकें नाही।।** (ज्ञाने. १३.१३७) – सृष्टीचे जड व चेतन असे विभाग अभ्यासाची सोय म्हणून सुरुवातीला सांगतात. परंतु ह्या दोन्हीत ब्रह्म समानत्वाने व्यापून आहे. **'जे सर्वत्र सदा सम। तेथ विभाग अधमोत्तम। मतिवेशें संभ्रम। विवंचिती।।'** (ज्ञाने. ४.७०) ब्रह्म कोठे आहे, कोठे नाही असे नसून कोठे जास्त, कोठे कमी असेही नाही. कधी आहे, कधी नाही असे नसून त्याच्या व्यापकत्वात तरतमभाव नाही. बुद्धीला भ्रम झाला तरच तो आहे असे वाटते.

४) ब्रह्म वस्तुनिष्ठ किंवा व्यक्तिनिष्ठ नाही. ते objective किंवा subjective नाही. वस्तुनिष्ठ ज्ञान वर्णनात्मक (Descriptive) असून व्यक्तिनिष्ठ ज्ञान विचारात्मक (Reflective) असते. ब्रह्म हा 'पदार्थ' नसल्याने त्याचे वर्णन होऊ शकत नाही. पदार्थ व त्याचे वर्णन ह्या शिवाय विचार होऊ शकत नाही.

५) 'दृक् दृश्य विवेक' ह्या आचार्यांच्या (?) ग्रंथात 'दृक्च्या ज्ञानप्रकाशात द्रष्ट्याला दृष्टीच्या मदतीने दृश्याचे ज्ञान होते' असा सूर आहे. त्यांत दृश्य हे प्रकाश्य असून दृक् (आत्मा) प्रकाशक आहे. प्रकाशक चेतन असून प्रकाश्य अचेतन आहे. असे असले तरी दृश्यामुळे दृक्चा अंदाज येण्यास मदत होते असे केन उपनिषद् सांगते. '**प्रतिबोध विदितं मतं अमृतत्वं हि विन्दते।**' (२.४). साभास अन्तःकरणवृत्तीला प्रमाणांच्या (ज्ञानेंद्रिये) मदतीने होणाऱ्या प्रमेयाच्या प्रमाज्ञानामुळे चिदाभासाच्या मूळ स्वरूपाचे (आत्मा) ज्ञान होते. प्रमेय म्हणजे कोणताही पदार्थ. प्रमाज्ञान म्हणजे प्रत्यक्ष होणारे ज्ञान. पदार्थ → प्रमाज्ञान → ज्ञानेंद्रिय → चिदाभास (जीव) → आत्मा. ह्या रीतीने सततच्या चिंतनाने अपरोक्षानुभूती येऊ शकते. ह्याच ग्रंथात शब्दानुविद्ध व दृश्यानुविद्ध समाधीचे अनोखे वर्णन केले आहे. ह्यातील दृश्यानुविद्धाचा ह्या श्रुतीशी थेट संबंध आहे.

६) विशिष्ट पद्धतीने अनुभव – शास्त्र व तर्क ह्यांचा विचार केला तर ज्या स्वरूपाची अपरोक्षानुभूती घ्यावयाची त्याचा अंदाज येतो व तशा सततच्या चिंतनाने ती येऊ शकते. 'अद्वैत मकरंद' ह्या कवी लक्ष्मीधरांच्या ग्रंथात तशी सूचना मिळते. '**अहमस्मि सदा भामि। कदाचिन्नाहमप्रियः।**' (अ.म. २) असा अनुभव, ब्रह्म सत् चित् आनंदरूप आहे हे शास्त्र व त्यावरून मी ब्रह्म आहे हा तर्क करता येतो. मी आहे, मी आहे ह्याचे मला सतत भान आहे व मी मला कधीच अप्रिय नाही असे अद्वैत मकरंद हा ग्रंथ सांगतो. ब्रह्म केवळ अस्तित्वरूप (सत्), शुद्धज्ञानरूप व विषयनिरपेक्ष सुखरूप (आनंद) आहे हे शास्त्राचे सांगणे प्रसिद्धच आहे. ह्यावरून संत श्रीज्ञानदेवांच्या ओवीला धरून विचार केला असता मी ब्रह्मरूप आहे असा निश्चय होऊन अपरोक्षानुभूतीला दिशा मिळते. '**देखे मनुष्यजात सकळ। हे स्वभावतां भजनशीळ। जाहलें असती केवळ। माझ्याचि ठायी।।**' (ज्ञाने. ४.६७) – प्रत्येक माणसाला आपण सतत असावे, आपल्याला कळावे व आपण सुखी असावे अशी सहज प्रेरणा असते (Instinct for survival, knowledge and happiness). ही प्रेरणा घेणारा जीव

असून ती सत् चित् आनंदरूप आत्म्याकडून मिळते. अशी प्रेरणा आपल्याला मिळते हे माणसाला ह्या भाषेत कळत नसले तरी जगण्याची इच्छा, ज्ञानाची वखवख व सुखासाठी तळमळीच्या रूपाने ती अनुभवाला येते. शरीर सतत जगणे शक्य नाही, ज्ञान अथांग असून ते सर्व प्राप्त होणे अशक्य आहे, सुखदुःख मिश्रित जीवन अटळ आहे असा विचार त्याने केला तर ह्या प्रेरणा जेथून मिळतात ते तत्त्व सत् रूपाने सतत आहे, चित् म्हणजे शुद्धज्ञान हे त्याचे स्वरूप आहे व सुखरूपत्व त्याचे ठिकाणी अखंड आहे हे त्याला कळेल. हे कळल्यावर देह, ज्ञेय पदार्थ व सुखाचे विषय ह्यांचे विषयी फेर विचार करून त्यांचेवर अस्तित्वासाठी, ज्ञानासाठी व सुखासाठी अवलंबून राहण्यात अर्थ नाही असा निश्चय होऊ शकेल. ह्यापुढे शास्त्र व श्रीगुरू ह्यांच्या मदतीने त्याने वाटचाल वेगाने चालू ठेवली तर सत्-चित्-आनंदरूप आत्म्याची अपरोक्षानुभूती त्याला येणे शक्य आहे.

श्रीगुरूंची सेवापूर्वक कृपा संपादणे, वैराग्य, आत्म-अनात्म ह्यांचा शास्त्रशुद्ध विचार, वासनांचे शमन, सुखासाठी विषयांवर अवलंबून न राहणे, प्रपंच व देहाला होणाऱ्या आघातांनी विचलित न होणे, मोक्षाची तीव्र इच्छा, साधनातील वेदान्तप्रणित विचाराचे महत्त्व इत्यादि सर्व अत्यंत महत्त्वाची सामुग्री अपरोक्षानुभूतीसाठी आवश्यक आहे. मी कोण आहे, भोवतीचे विश्व कसे तयार झाले, कोणी केले इत्यादि जिज्ञासा श्रीगुरू व वेदान्तशास्त्राच्या शिकवणीप्रमाणे पूर्ण करावी. मी देह, जग सत्य, मी कर्ता व भोक्ता इत्यादि भ्रमातून लवकरात लवकर सुटावे. ज्ञान, अज्ञान, वृत्तिज्ञान, भ्रमज्ञान इत्यादींचा निर्णय करून घ्यावा. ह्या सर्व सामुग्रीसह तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून साधनाभिमुख राहिले तरच अपरोक्षानुभूती येते व जीवन सफळ होते. शास्त्राभिमुख व साधनाभिमुख राहत राहत त्याचा जो परिणाम, आनंदानुभूती, तो लाभला की जीवनाभिमुखता येऊन जीवन कृतार्थ होते. जीवनाभिमुखतेत शास्त्र व साधना गौण होऊन आनंदमय जीवन मुख्य होते. '**म्हणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे। व्युत्पत्ति आघवी विसरिजे। जैं जगा धाकुटै होईजे। तैं जवळीक माझी।।**' (ज्ञाने.९.३७८)

ह्यातील 'व्युत्पत्ति' म्हणजे वेदान्तशास्त्राचा केलेला अभ्यास असून हा विचार बृहदारण्यक श्रुतीतील '**पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्।**' (३.५.१) ह्या आज्ञेचे जणू रूपान्तराच्या स्वरूपाचा आहे. '**अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन। तिन्ही लोक।**' ही संत तुकोबांची प्रतिज्ञा जीवनाभिमुख आहे. '**पुढती पुढती पुढती। इया ग्रंथ पुण्यसंपत्ती। सर्वसुखी सर्वाभूतीं। संपूर्ण होइजो।।**' (१८.१८०९) ही ज्ञानेश्वरीच्या फलश्रुतीतील एक फलश्रुती आहे. त्यातही 'सर्वाभूतीं सर्वसुखाचा' विचार आहे. अशी जीवनाभिमुखता परमार्थाला मिळाली की जीवन धन्य होते.

डॉ. श्री. द. देशमुख
मुरगुड